मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | सोमवार, दि. 30 जून 2025 | पान- 1

# महापालिका कर वसुलीसाठी राबवणार व्यापक मोहीम

## 1 जुलै 2025 पासून मालमत्ता कर वसुलीची मोहीम : थकबाकी न भरणाऱ्यांवर जप्ती सारखी कठोर कारवाई करण्याचे नियोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेने १ जुलै २०२५ पासून मालमत्ता कर वसुलीची मोहीम अधिक व्यापक स्वरुपात राबवण्याचे नियोजन केले आहे. वारंवार आवाहन करून तसेच जप्तीची नोटीस देऊन देखील कर न भरणाऱ्या थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई करण्याची मोहीम महापालिकेकडून हाती घेतली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत कर तात्काळ भरावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांसाठी ३० जून २०२५ पर्यंत संपूर्ण कराचा भरणा ऑनलाइन स्वरूपात केल्यास १० टक्के सवलत देण्यात येत आहे. याशिवाय महापालिकेने ३० जून २०२५ पर्यंत विविध कर सवलती जाहीर केल्या आहेत. आता या सवलतींचा लाभ घेण्यासाठी अवघा एक दिवस शिल्लक आहेत. ही योजना संपल्यानंतर मात्र १ जुलैपासून महापालिकेच्या वतीने कर वसुलीसाठी व्यापक मोहीम हाती घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.




### सवलतीचा लाभ घेतलेले आत्तापर्यंतचे मालमत्ताधारक

- महिला मालमत्ताधारक: १५,१५१
- माजी सैनिक: ३,७९०
- शौर्यपदधारक: ९
- पर्यावरणपूरक मालमत्ता: १३,९०१
- ऑनलाईन आगाऊ भरणा करणारे: २,८६,८४०
- दिव्यांग मालमत्ताधारक: १,५६१
- आगाऊ कर भरणारे: ३८,९१७

अद्यापही ज्या थकबाकीदारांनी मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांना जप्तीपूर्व नोटीस बजावण्यात येणार असून यापूर्वी ज्यांना अशी नोटीस दिली आहे, त्यांच्यावर केव्हाही जप्तीची कारवाई केली जाऊ शकते. यामध्ये निवासी मालमत्ता धारकांचे वाहन, टीव्ही, फ्रिजसारख्या वस्तू जप्त करण्यात येणार आहे, अशी माहिती कर संकलन आणि कर आकारणी विभागातून देण्यात आली. तरी नागरिकांनी आपला चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत कर भरून या सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

ज्या मालमत्ताधारकांनी धनादेशाद्वारे कराचा भरणा केला, परंतू त्यांचे धनादेश वटले नाहीत, अशा मालमत्तांधारकांना लवकरच जप्ती अधिपत्र पाठवून त्यांच्यावर जप्तीची कारवाई केली जाणार आहे. ही जप्तीची कारवाई टाळण्यासाठी सदर मालमत्ताधारकांनी ३० जूनपूर्वी आपला मालमत्ता कर ऑनलाईन किंवा रोख स्वरूपात भरावा, असे कर संकलन आणि कर आकारणी विभागातून सांगण्यात आले.

### एकूण 465.55 कोटींचे कर संकलन

- वाकड – ५७.९५ कोटी
- थेरगाव – ४३.२९ कोटी
- चिखली – ३५.६७ कोटी
- कस्पटे वस्ती – ३४.७० कोटी
- किवळे – ३०.८४ कोटी
- भोसरी – ३०.७९ कोटी
- चिंचवड – ३०.२९ कोटी
- पिंपरी वाघेरे – ३० कोटी
- मोशी – २७.०३ कोटी
- सांगवी – २५.३० कोटी
- मनपा भवन – २४.५६ कोटी
- आकुर्डी – २१.८५ कोटी
- फुगेवाडी दापोडी – १६.४९
- चऱ्होली – १४.३५ कोटी
- निगडी प्राधिकरण – ११.९६
- तळवडे – १०.८६ कोटी
- दिघी बोपखेल – १०.४९ कोटी
- पिंपरी नगर – ३.७१ कोटी

“ पिंपरी चिंचवड महापालिकेचा मालमत्ता कर न भरणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. वारंवार आवाहन करून देखील मालमत्ता कराची थकबाकी न भरणाऱ्यांवर जप्ती सारखी कठोर कारवाई करण्याचे नियोजन आहे. १ जुलैपासून यासाठी व्यापक मोहीम हाती घेणार आहोत. त्यामुळे जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी तात्काळ मालमत्ता कर भरून भविष्यात होणारी कारवाई टाळावी.

**- प्रदीप जांभळे पाटील ,अतिरिक्त आयुक्त, पिंपरी- चिंचवड महानगरपालिका**

“ पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ताधारकांसाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने ३० जून २०२५ पर्यंत विविध कर सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी आता फक्त एक दिवसच संधी बाकी आहे. त्यामुळे ३० जून पूर्वी संपूर्ण कराचा भरणा करून सवलतींचा लाभ घ्यावा.

**- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

---

# मास्टरस्ट्रोक..! आमदार महेश लांडगे यांच्या मागणीनंतर ‘हिंजवडी’ प्रश्नांवर तातडीने बैठक

## मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव घेणार हिंजवडी परिसरातील ‘पाणीबाणी’वर आढावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मान्सूनपूर्व तसेच मोसमी पावसामुळे गेल्या महिन्याभरात हिंजवडी परिसरात अक्षरशः ‘पाणीबाणी’ निर्माण झाल्याची स्थिती होती. या समस्येमुळे या भागातील नागरिक, आयटीयन्स यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. आयटी पार्कमधील कर्मचारी वर्ग तासंतास रस्त्यावर अडकून पडला. याशिवाय वारंवार होणारी वाहतूक कोंडी, मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे वैतागलेल्या नागरिकांनी #UNCLOGHINJAWADIITPARK ही स्वाक्षरी मोहीम सुरू केल्यानंतर याची दखल घेत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी घेतली थेट मुख्यमंत्र्यांना लक्ष घालण्याची विनंती केली. यावर तात्काळ कार्यवाही सुरु झाली असून, प्रधान सचिव यांनी बैठक लावली आहे.




हिंजवडी आणि परिसरातील पायाभूत समस्या तसेच हिंजवडीचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करणे या मुद्द्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रधान सचिव यांनी तातडीने संबंधित सर्व विभागांना सोमवारी (दि 30) बैठकीसाठी बोलावले आहे.

दरम्यान, काही दिवसपूर्वी हिंजवडी परिसरात पाणी साचून नागरिकांचा खोळंबा होतो, गैरसोय होते. याला नक्की जबाबदार कोण? याचीही झाडाझडती या बैठकीच्या माध्यमातून घेतली जाणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव सोमवारी सायंकाळी पाच वाजता मुंबई मंत्रालयात याबाबत आढावा बैठक घेणार आहेत. बैठकीसाठी पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पुणे जिल्हापरिषद, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., टाटा मेट्रो, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना बोलविण्यात आले आहे.

# ‘एचएसआरपी’ लावण्याबाबत पुणे ठरतेय उणे

## शहरात 25 लाख पात्र वाहनांपैकी केवळ साडेतीन लाख वाहनांवर 25 जूनपर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारचा आदेश असूनही २५ लाखांपैकी फक्त साडेतीन लाख वाहनांनाच लावल्या हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट्स; जास्त दर, फिटमेंट सेंटर्स खूप दूर, ऑनलाइन फॉर्ममध्ये त्रुटी आणि इतर अनेक अडचणींच्या पुणेकरांनी केल्या तक्रारी

सर्व नोंदणीकृत वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट्स (एच एसआरपी) सक्तीच्या करणारा रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचा आदेश असूनही, पुण्यात अजूनही याबाबत फारशी गती दिसून येत नाही. शहरात २५ लाख पात्र वाहनांपैकी केवळ साडेतीन लाख वाहनांवर २५ जूनपर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यात आली आहे.

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) सीविक मिरर’ला ही माहिती दिली. वाहनांची ओळख सोपी करणे, चोरी रोखणे आणि क्रमांक प्लेटचे एकसंधीकरण साधणे या हेतूने सुरू करण्यात आलेली ही योजना प्रत्यक्षात मात्र अनेक अडथळ्यांना सामोरी जात आहे. यामुळे योजनेच्या अंमलबजावणीतील नियोजन, अपुरी जनजागृती आणि उपलब्ध सुविधा यावर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.



### सुलभ प्रक्रियेची गरज

- स्थानिक स्तरावर अधिक फिटमेंट सेंटर्स उभारावीत
- प्लेट बसवण्याच्या खर्चावर मर्यादा आणाव्यात
- ज्येष्ठ नागरिकांसाठी वॉक-इन सुविधा उपलब्ध कराव्यात
- निवासी सोसायट्यांमध्ये मोबाईल सेवा व्हॅन्स पाठवाव्यात

### २५ जूनपर्यंतची परिस्थिती

- २०१९ पूर्वी नोंदणीकृत पात्र
- वाहने : २५ लाख
- एकूण एचएसआरपी
- ऑर्डर : ५ लाख ९६ हजार ५९८
- शेड्युल केलेल्या अपॉइंटमेंट
- ४ लाख ९८ हजार २३
- प्रत्यक्ष एचएसआरपी बसवलेली वाहने : ३ लाख ५० हजार ५७१

> एचएसआरपी प्लेट बसवण्याची अंतिम मुदत १५ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली आहे. कोणालाही फिटमेंट किंवा डेटा संबंधित अडचणी असल्यास त्यांनी पुणे आरटीओच्या अधिकृत वेबसाइटवर मार्गदर्शनासाठी भेट द्यावी.
> - स्वप्नील भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे आरटीओ

वाहनधारकांनी याबाबत अनेक अडचणी सांगितल्या. अपॉईंटमेंटच्या मिळणाऱ्या वेळा सोयीच्या नाहीत. घरापासून खूप दूर असलेली फिटमेंट सेंटर्स, अवघड ऑनलाइन नोंदणी फॉर्म, आणि जास्त दर या कारणांमुळे त्याला पुणेकरांनी अद्याप तरी अपेक्षित प्रतिसाद दिलेला नाही. २५ लाख वाहनांपैकी केवळ साडेतीन लाख वाहनांवर एचएसआरपी लागणे ही तफावत अंमलबजावणीतील त्रुटी आणि नागरिकांची अनिच्छा स्पष्ट दाखवते.

कोंढवा येथील रहिवासी रेहान शेख म्हणाले, “ऑफिसचं काम आणि रोजच्या धावपळीत वेळच मिळत नाही. मला पिंपरीचं फिटमेंट सेंटर देण्यात आले आहे. ते माझ्या घरापासून खूप लांब आहे. फक्त एक प्लेट लावायला इतक्या दूर जायचं म्हणजे किती तरी वेळ वाया जाणार. मी जवळचं सेंटर निवडण्याचा प्रयत्न केला, पण यश आले नाही. शिवाय, ४०० ते ५०० रुपये खर्चून घरी बसवायचं म्हटलं तर अजून महाग.”

बालेवाडी येथील नागरिक सागर देशमुख यांचाही अनुभव तसाच होता. “वेबसाईटवर नोंदणी करताना माझ्या वाहनाचे डिटेल्स सापडतच नाहीत, माझा मोबाईल नंबर आरटीओशी लिंक असूनही असे होते आहे.. अर्ज पूर्णच होत नाही. खूप त्रास होतो,” अशी अडचण त्यांनी सांगितली.

काही पुणकरांनी ही संकल्पनाच अनावश्यक असल्याची टीका केली. थेरगाव येथील दुचाकीधारक विजय ढाकणे म्हणाले, “माझ्या जुन्या गाडीवर आधीच नंबर प्लेट आहे, तर परत का खर्च करायचा? त्याऐवजी नवीन गाडी घेऊन टाकेन.”

हे अडथळे वेळीच दूर केले नाहीत, तर पुणे पुन्हा एकदा अंतिम मुदतीआधीच अपयशी ठरण्याची शक्यता आहे. ज्याचा परिणाम रस्ते सुरक्षेवर होईल आणि प्रशासनावर अतिरिक्त भार वाढेल. १५ ऑगस्टची अंतिम मुदत जवळ येत असताना, एकीकडे आरटीओने अंमलबजावणीतील अडचणी सोडवाव्यात, तर दुसरीकडे पुणेकरांनी आता तरी सहकार्याची भूमिका घेतली पाहिजे.

# ‘सारथी’ला निधी कमी पडू दिला जाणार नाही, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

## संस्थेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात यूपीएससी परीक्षेतील नऊ, एमपीएससी परीक्षेतील 91 यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

**पुणे | प्रतिनिधी**

यूपीएससी, एमपीएससीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी प्रशासनात लोकाभिमुख काम केले पाहिजे. समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना मदत करणे आवश्यक आहे,’ असे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ‘सारथी संस्थेच्या कामाला गती देण्याचे काम शासनामार्फत करण्यात येत असून, त्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही,’ अशी ग्वाही दिली.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) या संस्थेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात यूपीएससी परीक्षेतील नऊ, एमपीएससी परीक्षेतील ९१ यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार पवार यांच्या हस्ते करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. सारथी संस्थेचे अध्यक्ष अजित निंबाळकर, संचालक उमाकांत दांगट, मधुकर कोकाटे, डॉ. नवनाथ पालकर, किशोरराजे निंबाळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, ‘सारथी’चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शिवाजी पाटील या वेळी उपस्थित होते. याच कार्यक्रमात ‘सारथी’च्या यशोगाथांवर आधारित ‘विजयी भव’ व ‘सारथी उपक्रम माहिती’ या पुस्तकांचे प्रकाशन झाले.

पवार म्हणाले, ‘विविध योजनांचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना होण्यासाठी ‘सारथी’च्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी येणाऱ्या काळात सामाजिक जबाबदारी म्हणून नवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. तसेच, संस्थेचा नावलौकिक वाढवा. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाला साजेसे काम विद्यार्थ्यांनी करावे. संस्थेचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे क्रांतिकारी सामाजिक कार्य विसरता येणार नाही. राज्यातील शासकीय, निमशासकीय, खासगी संस्था या सर्वांच्या कार्याचा आदर्श राजर्षी छत्रपती शाहू महाराजच आहेत.’

‘राज्यात १९८० च्या दशकात यूपीएससी, एमपीएससीमध्ये निवड होण्याचे प्रमाण हे नगण्य होते. गेल्या चार ते पाच वर्षांत त्यात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. आगामी काळात सारथी संस्थेमार्फत मोठ्या प्रमाणात उत्तमोत्तम प्रशासकीय अधिकारी तयार होऊन महाराष्ट्राच्या विकासास मोठी गती देतील,’ अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# उद्योगनगरीमध्ये ८० इमारती धोकादायक

## महापालिकेकडून केवळ दिल्या नोटिसा; सहा इमारती अतिधोकादायक श्रेणीत, ७२ इमारतींची प्रकरणे प्रलंबित

**पिंपरी | प्रतिनिधी**


पावसाळा सुरू झाला असून पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात तब्बल ८० धोकादायक इमारती आढळून आल्या आहेत. त्यात सहा इमारती ह्या अतिधोकादायक बनल्या आहेत. त्यामुळे पावसाळ्याच्या तोंडावर त्या इमारत मालकांना केवळ नोटिसा देण्यात आल्या आहेत. मात्र, हवामान खात्यानुसार यंदा पाऊस मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्यामुळे धोकादायक इमारतीपासून नागरिकांना धोका झाल्यास प्रशासन जबाबदारी घेणार का? असा सवाल नागरिक उपस्थितीत करत आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात गतवर्षी ८८ धोकादायक इमारती आढळून आल्या होत्या. परंतु, या वर्षीची संख्या कमी झाली आहे. महापालिका बांधकाम विभागाने केलेल्या सर्वेक्षणात शहरात ८० धोकादायक इमारती आढळून आल्या. तर अतिधोकादायक ६ इमारती आहेत. इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती केलेल्या ९ इमारत आहेत. इमारत रिकाम न करता दुरुस्ती केलेल्या १६ इमारती आणि किरकोळ दुरुस्ती ४९ इमारतीची झालेली आहे.

धोकादायक इमारती स्व:ता पाडलेल्या आणि दुरुस्त करून सुरक्षित झालेल्या ८ इमारती आहेत. आणखी ७२ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यात सहा अतिधोकादायक इमारतींचाही समावेश आहे. पावसाळा तोंडावर असताना इमारतींना प्रशासनाने नोटिसा देण्यापलीकडे ठोस कारवाई केलेली नाही.

शहरात पावसाळ्यात धोकादायक इमारत, भिंती कोसळून दुर्घटना घडतात. त्यासाठी दरवर्षी पावसाळ्यापूर्वी महापालिकेकडून जुन्या इमारती, वाडे, घरे यांचे सर्वेक्षण करून धोकादायक इमारती निश्चित केल्या जातात. आयुक्त शेखर सिंह यांनी बैठक घेऊन अनधिकृत होर्डिंगसह धोकादायक इमारतींची पाहणी करून योग्य कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

परंतु, धोकादायक इमारतींबाबत महापालिकेकडून केवळ माहिती संकलन व नोटिसा देण्याचे कागदी घोडे नाचविले जात आहेत. शहरात या पावसाळ्यापूर्वी एकूण ८० धोकादायक इमारती निदर्शनास आल्या. तर प्रलंबित ७२ प्रकरणामुळे त्या इमारतीमुळे नागरिकांना धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.





### एकही धोकादायक इमारत पाडली नाही...

» महापालिकेकडून ८० इमारतधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यापैकी इमारत मालकांनी पाडलेल्या किंवा दुरुस्त केलेल्या इमारतींची संख्या फक्त १६ आहे. उर्वरित धोकादायक इमारतींबाबत कार्यवाही झालेली नसल्याचे समोर आले आहे. तर, या वर्षी महापालिकेने एकही धोकादायक इमारत पाडलेली नाही.

### दरवर्षी कागदोपत्रीच खेळ

» पावसाळ्यात अनेकदा इमारत कोसळून, भिंती कोसळून दुर्घटना घडतात. त्यासाठी दरवर्षी पावसाळ्यापूर्वी महापालिकेकडून जुन्या इमारती, वाडे, घरे यांचे सर्वेक्षण करून धोकादायक इमारती निश्चित केल्या जातात. आयुक्त शेखर सिंह यांनी पावसाळ्याच्या पूर्वी अनधिकृत होर्डिंग्जसह धोकादायक इमारतींची पाहणी करून योग्य कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, धोकादायक इमारतींबाबत महापालिकेकडून केवळ माहिती संकलन व नोटीस देण्याचे कागदी घोडे नाचविले. प्रत्यक्षात मात्र काहीही कारवाई केलेली नाही.

> शहरातील कोणतीही इमारत सुरक्षित राखण्याची जबाबदारी प्रत्येक इमारत मालकाची आहे. सर्वेक्षणात आढळलेल्या धोकादायक इमारती धारकांना प्रशासनाने नोटीस दिलेल्या आहेत. त्यासाठी इमारतीची तपासणी तज्ञ अभियंत्यांकडून करून घ्यावी. त्यांच्या सूचनेनुसार इमारत दुरुस्त करून घ्यावी किंवा पाडावी. अति धोकादायक इमारतींबाबत प्रशासन कठोर भूमिका घेईल. ज्या इमारतीमुळे सार्वजनिक जीवितास धोका निर्माण होईल, अशी स्थिती उद्भवते, ती पाडली जाते.
>
> **- मकरंद निकम, शहर अभियंता, महापालिका**

# सोसायट्यांमधील पाणी पुरवठा बंद; रहिवाशांना पाण्यासाठी टँकरवर भिस्त

## आवाहन करूनही सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित न करणा-या 16 सोसायट्यांचा महापालिकेच्या पर्यावरण विभागाने पिण्याच्या पाण्याचे नळजोड खंडीत केले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील शंभरहून अधिक सदनिका असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांना वारंवार आवाहन करूनही सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यान्वित न करणा-या 16 सोसायट्यांचा महापालिकेच्या पर्यावरण विभागाने पिण्याच्या पाण्याचे नळजोड खंडीत केले आहेत. त्यामुळे या सोसायट्यांमधील नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. एसटीपी सुरू न केल्यास नळजोड खंडीत करण्याची कारवाई सुरूच राहणार असल्याचे अधिका-यांनी स्पष्ट केले आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. सद्यस्थितीत शहरवासीयांना 620 ते 630 दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी एका दिवसाला दिले जाते. वाढत्या लोकसंख्येला हे पाणी पुरत नाही. मागील सहा वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरु आहे. लोकसंख्या वाढली मात्र पाण्याची उपलब्धतता वाढली नाही. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची समस्या गंभीर होते. शहरातील अनेक मोठ्या सोसायट्यांना टँकर, बोअरवेलच्या पाण्याचा आधार घ्यावा लागत आहे.

एकत्रीत बांधकाम व विकास नियमावलीनुसार (युडीसीपीआर) 20 हजार चौरस मीटर पुढील क्षेत्रफळावरील, शंभर सदनिका आणि दररोज 20 हजार लिटर पाण्याचा वापर करणाऱ्या गृहनिर्माण सोसाट्यांना पाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रिकरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात 456 मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या आहेत. यामधील 264 सोसायट्यांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित आहेत. तर, एसटीपी सुरू करण्याचे वारंवार आवाहन करूनही 184 सोसायट्यांमधील एसटीपी विविध कारणांनी बंद होते. तर आठ सोसायट्यांमध्ये महापालिकेच्या पथकाला प्रवेशच देण्यात आला नव्हता. सोसायट्यांना वारंवार आवाहन करूनही सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यान्वित न करणा-या 16 सोसायट्यांचा महापालिकेच्या पर्यावरण विभागाने पिण्याच्या पाण्याचे नळजोड खंडीत केले आहेत.

> एसटीपी बंद असलेल्या 50 सोसायट्यांचे नळजोड खंडीत करण्याची कारवाई सुरू असून आतापर्यंत 16 सोसायट्यांचे पाणी खंडीत केले आहे. उर्वरित सोसायट्यांचे नळजोड खंडीत करण्यात येत आहे. त्यामुळे सोसायटीमधील सभासद, पदाधिका-यांनी एसटीपी सुरू करावेत. अन्यथा पाणी पुरवठा खंडीत केला जाईल.
>
> **- संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, महापालिका.**

# ज्ञानोबा..तुकाराम जयघोषाने बेलवाडी दुमदुमली...!

## संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील पहिले गोल रिंगण उत्साहात संपन्न, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते अश्वांचे पूजन

**पुणे | प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील लाखो वारकरी, क्षेत्र देहू येथून हरिनाम गात मजल दर मजल करत क्षेत्र पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनाला जाताना पालखी सोहळ्यातील पहिले मानाचे गोल रिंगण बेलवाडी (ता. इंदापूर) येथे भक्ती रसात नाहून जय घोष करीत वाटचाल करतात. हीच प्रथा यंदाही पालखी सोहळ्याने जपत मानाचे दोन अश्व गोल रिंगणात सोडून या अश्वांच्या तीन परिक्रमेने वारकऱ्यांनी अनेक सांप्रदायिक खेळ खेळत पहिले गोल रिंगण उत्साहात पार पडले.

धन्य मी मानिण आपुले संचित<br>
राहिलीसे प्रीत तुझे नामी |<br>
धन्य जालो आता यासी संदेह नाही<br>
न पडे या वाही काळा हाती |<br>
ब्रम्हरस करू भोजन पंगती |<br>
संताचे संगती सर्वकाळ |

विठ्ठल नामाचा महिमा गात निघालेल्या संत तुकाराम महाराज पालखी सोहळयांतील पहिले गोंल रींगण टाळकरी, विणेकरी, पताकावाले, पखवांजे व तुळशिवाल्या महिला व मानाचे अश्व यांनी सुरू असलेल्या हरीनामाचा गजरात परीक्रमा पुर्ण करीत. गोल रींगण सोहळ्यात लाखो नयनांचे पारणे फेडले.

ज्ञानोबा....तुकाराम..ज्ञानोबा.. तुकाराम या हरी गजराने बेलवाडी दुमदुमली.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळयांचे सालाबाद प्रमाणे,यंदाही सणसर गावच्या हददीतील मुक्काम आटपून सकाळ च्या प्रहरात बेलवाडी कडे पालखी सोहळा मार्गस्थ झाला. या पालखी सोहळयांत बेलवाडी गावात पहिले गोंल रींगण असल्याने इंदापूर, बारामती, दौंड या तालुक्यातील मोठ्या संख्येने रिंगण सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी नागरिक उपस्थित होते.

माऊली...माऊली असा आवाज आसमंतात पोहचत होता. काहि निमिश्यांचा विलंब न लावता रिंगणातील अश्वांनी परीक्रमा पुर्ण केल्या. फुगडयां पावल्या रंगल्या होत्या. अश्वांच्या दौडीनंतर रींगण सोहळ्यांची सांगता करण्यांत आली.

पांडुरंगा काहि आईकावी मात!<br>
न करावे मुक्त आता मज !<br>
जन्मांतरे मज तैशी देई देवा !<br>
जेणे चरण सेवा घडे तुझी !

बेलवाडीकर नेहमी वारकर्यांची सेवा करण्यासाठी आतुर झालेले असतात. त्याच पध्दतीने आपल्या घरी वारकर्यांना भोजन व इतर सेवा देऊन वारकर्यांचा पाहुचांर न्हाहरी दिली. अशीच सेवा जन्मोजन्मी मिळू दे, असे साकडे गावकरी घालताना दिसत होते. दुपारच्या विश्वातीसाठी पालखी गावकर्यांनी गुलाब फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करीत गावाती ल मारूत्ती मंदिरात आणली. तोफांची सलामी देत गावकर्यांनी स्वागत केले.



### क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते अश्वांचे पूजन

**» तुकोबारायांचा पालखी रथ रिंगण स्थळी सकाळी ७.४० मिनिटांनी दाखल झाला. गावकऱ्यांनी पालखी रथातून खांद्यावर घेत रिंगण स्थळावरील शामियानात जयघोष करीत आणली. यावेळी राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे तसेच पालखी विश्वस्तांच्या हस्ते रिंगण सोहळ्यात मानांच्या आश्वांचे पूजन पार पडले. सर्व विभागाचे शासकीय अधिकारी व गावकरी उपस्थित होते. वार्यांच्या वेगाने विणेकरी झेंडेकरी, टाळकरी धावले व मानाचे अश्व पुजन क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांचे हस्ते करून रिंगणात सोडण्यात आले.**

### तोफांची सलामी

**» बेलवाडीकर नेहमी वारकर्यांची सेवा करण्यासाठी आतुर झालेले असतात. त्याच पध्दतीने आपल्या घरी वारकर्यांना भोजन व इतर सेवा देऊन वारकर्यांचा पाहुचांर न्हाहरी दिली. अशीच सेवा जन्मोजन्मी मिळू दे, असे साकडे गावकरी घालताना दिसत होते. दुपारच्या विश्वातीसाठी पालखी गावकर्यांनी गुलाब फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करीत गावातील मारूत्ती मंदिरात आणली. तोफांची सलामी देत गावकर्यांनी स्वागत केले. दुपारची न्याहरी घेऊन पालखी सोहळा लासुर्ण जंक्शन अंथूर्णे मार्गी निमगाव केतकी कडे मार्गस्थ होणार आहे.**

# आंबेगाव तालुक्यात ऊस लागवडीच्या कामाला वेग

## पाऊस उघडल्याने शेतकरी शेतीच्या कामात मग्न, एक जून पासून ऊस लागवडीचा कार्यक्रम सुरू होतो.

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील विविध गावांमध्ये ऊस लागवडीच्या कामांना वेग आला आहे.एक जून पासून ऊस लागवडीचा कार्यक्रम सुरू होतो. परंतु यावर्षी मे महिन्यापासूनच सुरू झालेल्या पावसाने शेतकऱ्यांना शेती कामे करण्यासाठी पावसामुळे वापसा मिळाली नाही. सध्या पाऊस थोडासा उघडल्याने शेतकरी ऊस लागवड करण्यात मग्न झाले आहे.

आंबेगाव तालुक्यातील बारमाही पाणी उपलब्ध आहे. घोडनदीवर बांधण्यात आलेले हुतात्मा बाबू गेनु सागर डींभे धरण यामुळे घोडनदीला बारमाही पाणी राहते.तसेच उजवा व डावा कालव्यालाही पाणी येते. त्यामुळे तालुक्यातील विविध गावे ही सुजलाम सुफलाम झाली असून बारमाही बागायती झाली आहेत. भीमाशंकर सहकारी साखर कारखाना येथे असल्याने ऊस लागवडीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे.

सर्वात जास्त ऊसाची शेती केली जाते. एक जून पासून ऊस लागवडीचा कार्यक्रम सुरू होतो. त्यामुळे शेतकरी ऊस लागवड एक जूनपासून सुरू करतात. परंतु यावर्षी मे आणि जून महिन्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस सुरु असल्याने ही ऊस लागवड कुठेतरी थांबली होती.

आता पावसाने थोडीशी उसंत घेतल्याने शेतकरी ऊस लागवडीची कामे करत असून शेती मशागत करून ताबडतोब लागवड करून घेत आहे. कारण परत पाऊस झाला तर उसाची लागवडीला उशीर होईल. त्यामुळे शेतकरी सध्या ऊस लागवड करताना पाहावयास मिळत आहे. २६५ जातीच्या वाणाच्या उसाची लागवड जास्त प्रमाणावर होत आहे.

तरकारी पिकांचे कायम वर खाली होणारे बाजार भाव,दुधाचा पडलेला भाव यामुळे हक्काचे उत्पन्न देणारे पीक म्हणून ऊस पिकाकडे पाहिले जाते. सध्या ३००० ते ३२०० रुपये प्रति टन असा बाजारभाव मिळत आहे. आंबेगाव तालुक्यातील विविध गावांमध्ये ऊस लागवडीच्या कामांना वेग आला आहे.एक जून पासून ऊस लागवडीचा कार्यक्रम सुरू होतो.परंतु यावर्षी मे महिन्यापासूनच सुरू झालेल्या पावसाने शेतकऱ्यांना शेती कामे करण्यासाठी पावसामुळे वापसा मिळाली नाही. सध्या पाऊस थोडासा उघडल्याने शेतकरी ऊस लागवड करण्यात मग्न झाले आहे.



### सध्या ऊसालाच चांगला भाव

**» तरकारी पिकांचे कायम वर खाली होणारे बाजार भाव,दुधाचा पडलेला भाव यामुळे हक्काचे उत्पन्न देणारे पीक म्हणून ऊस पिकाकडे पाहिले जाते. सध्या ३००० ते ३२०० रुपये प्रति टन असा बाजारभाव मिळत आहे.अनेक शेतकरी हमखास पैसे देणारे पीक म्हणून या पिकाची लागवड करतो. पावसाने उसंत घेतल्याने उस लागवड करण्याचा कामांना वेग आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**